श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भगवद्गीता अथाष्टादशोऽध्याय मराठी



पार्थ सारथी ने समझाया धर्म -कर्म का ज्ञान,
मानव जीवन सफल बना ले गीता अमृत मान।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

विजयाचे साधन असलेल्या या श्रीमद्भागवताचे पठण करण्यापूर्वी, एखाद्याने भगवान नारायण, परम मानव नर-नारायण ऋषी, विद्येची देवी माता सरस्वती आणि लेखक श्रील व्यासदेव यांना आदरपूर्वक नमस्कार केला पाहिजे.

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

मी परमप्रभू हरि यांना आदरपूर्वक वंदन करतो, ज्यांच्या पवित्र नावांचा सामूहिक जप सर्व पापी प्रतिक्रियांचा नाश करतो आणि ज्यांच्या प्रणाम अर्पण केल्याने सर्व भौतिक दुःख दूर होतात.

**श्रीमद्भगवद्गीतायां(न्)**
**अष्टादशोऽध्यायः**

**अर्जुन उवाच**

**सन्न्यासस्य महाबाहो, तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।**
**त्यागस्य च हृषीकेश, पृथक्केशिनिषूदन ॥ 1 ॥**

अर्जुन म्हणाला,हे महाबाहो !हे अंतर्यामी !हे वासुदेवा!मी संन्यास आणि त्याग यांचे तत्व वेगवेगळे जाणू इच्छितो .

**श्रीभगवानुवाच**

**काम्यानां(ङ्) कर्मणा न्यासं(म्), सन्न्यासं(ङ्) कवयो विदुः ।**

सर्वकर्मफल*त्यागं(म्), प्राहुस्त्यागं(वँ) विच*क्षणाः ॥ 2 ॥

श्री भगवान म्हणाले ,कित्येक पंडित कामे कर्मांच्या त्यागाला संन्यास मानतात ;तर दुसरे काही विचार कुशल लोक सर्व कर्मांच्या फळाच्या त्यागाला त्याग म्हणतात .

त्याज्यं(न्) दोषवदि*त्येके, कर्म* प्राहुर्मनीषिणः ।

य*ज्ञदानतपः(ख्)कर्म, न* त्याज्यमिति चापरे ॥ 3 ॥

कित्येक विद्वान असे म्हणतात की ,सर्व कर्मे दोषयुक्त आहेत म्हणून (ती) टाकणे योग्य होय आणि दुसरे विद्वान असे म्हणतात की,यज्ञ,दान आणि तपरूप कर्मे टाकणे योग्य नाही .

नि*श्चयं(म्) शृणु मे त**त्र, त्यागे भरतसत्तम ।

त्यागो हि पुरु*षव्या*घ्र, त्रिविधः(स्) सम्प्रकीर्तितः ॥ 4 ॥

हे पुरुष श्रेष्ठ अर्जुना !संन्यास आणि त्याग या दोन पैकी प्रथम त्यागाच्या बाबतीत माझा निर्णय ऐक .कारण त्याग सात्विक ,राजस आणि तामस या भेदांमुळे तीन प्रकारचा सांगितला आहे .

य*ज्ञदानतपः(ख्)कर्म, न* त्याज्यं(ङ्) कार्यमेव तत् ।

य*ज्ञो दानं(न्) त*पश्चैव, पावनानि मनीषिणाम् ॥ 5 ॥

यज्ञ ,दान आणि तपरूप कर्मटाकणे योग्य नाही .उलट ते अवश्य केले पाहिजे .कारण यज्ञ दान व तप ही तीनही कर्मे बुद्धिमान माणसांना पवित्र करणारी आहेत .

एतान्यपि तु कर्माणि, स*ङ्गं(न्) त्यक्त्वा फलानि च ।

क*र्तव्यानीति में पार्थ, नि*श्चितं(म्) मतमुत्तमम् ॥ 6 ॥

म्हणून हे पार्था !ही यज्ञ ,दान व तप रूप कर्मेतसेच इतरही सर्व कर्तव्य कर्मे आसक्तीआणि फुलांचा त्याग करून अवश्य केली पाहिजेत .हे माझे निश्चित असे उत्तम मत आहे .

नियत*स्य तु सन्न्यासः(ख्), कर्मणो नोपप*द्यते ।

मोहात्त*स्य परि*त्यागस्- तामसः(फ्) परिकीर्तितः ॥ 7 ॥

( निषिद्ध आणि काम्य कर्मांचा तर स्वरूपतः त्याग करणे योग्यच आहे . ) परंतु नियत कर्माचा स्वरूपतः त्याग योग्य नाही .म्हणून मोहाने त्याचा त्याग करणे याला ' तामस ' त्याग म्हटले आहे

दुःखमि*त्येव य*त्कर्म, काय*क्लेशभयात्त्यजेत् ।

स कृ*त्वा राजसं(न्) त्यागं(न्), नैव* त्यागफलं(लँ) लभेत् ॥ 8 ॥

जे काही कर्म आहे ,ते दुःख रूपच आहे ,असे समजून जर कोणी शारीरिक त्रासाच्या भीतीने कर्तव्य करणे सोडून देईल,तर त्याला असा राजस त्याग करून त्यागाचे फळ कोणत्याही प्रकारे मिळत नाही .

कार्यमि*त्येव य*त्कर्म, नियतं(ङ्) क्रियतेऽर्जुन ।

स*ङ्गं(न्) त्यक्त्वा फलं(ञ्) चैव, स* त्यागः(स्) सात्त्विको मतः ॥ 9 ॥

हे अर्जुना !जे शास्त्र विहित कर्म' करणे कर्तव्य आहे' या भावनेने आसक्तीआणि फळाचा त्याग करून केले जाते,तोच'सात्विक' त्याग मानला गेला आहे .

न द्वेष्ट्यकुशलं(ङ्) कर्म, कुशले नानुषज्जते ।

त्यागी सत्त्वसमाविष्टो, मेधावी छिन्नसं(म्)शयः ॥ 10 ॥

जो मनुष्य कुशल नसलेल्या कर्माचा द्वेष करीत नाही आणि कुशल कर्मांत आसक्त होत नाही,तो शुद्ध सत्वगुणी पुरुष संशय रहित ज्ञानी व खरा त्यागी होय .

न हि देहभृता शक्यं(न्), त्यक्तुं(ङ्) कर्माण्यशेषतः ।

यस्तु कर्मफलत्यागी, स त्यागीत्यभिधीयते ॥ 11 ॥

कारण शरीरधारी कोणत्याही माणसाकडून पूर्णपणे सर्व कर्मांचा त्याग केला जाणे शक्य नाही.म्हणून जो कर्म फळाचा त्यागी आहे,तोच त्यागी आहे,असे म्हटले जाते.

अनिष्टमिष्टं(म्) मिश्रं(ञ्) च, त्रिविधं(ङ्) कर्मणः(फ्) फलम् ।

भवत्यत्यागिनां(म्) प्रेत्य, न तु सन्न्यासिनां(ङ्) क्वचित् ॥ 12 ॥

हे महाबाहो !सर्व कर्मांच्या सिद्धींची ही पाच कारणे,कर्मांचा शेवट करण्याचा उपाय सांगणाऱ्या संख्याशास्त्रात सांगितली गेली आहेत.ती तू माझ्याकडून नीट समजून घे .

पञ्चैतानि महाबाहो, कारणानि निबोध मे ।

साङ्ख्ये कृतान्ते प्रोक्तानि, सिद्धये सर्वकर्मणाम् ॥ 13 ॥

कर्म पूर्ण होण्यासाठी अधिष्ठान,कर्ता,निरनिराळ्या प्रकारची कारणे,अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या क्रिया आणि तसेच पाचवे कारण दैव आहे .

अधिष्ठानं(न्) तथा कर्ता, करणं(ञ्) च पृथग्विधम् ।

विविधाश्च पृथक्चेष्टा, दैवं(ञ्) चैवात्र पञ्चमम् ॥ 14 ॥

मनुष्य मन,वाणी आणि शरीराने शास्त्राला अनुसरून किंवा त्याविरुद्ध जे कोणतेही कर्म करतो ,त्याचीही पाचही कारणे असतात .

शरीरवाङ्मनोभिर्यत्- कर्म प्रारभते नरः ।

न्याय्यं(वँ) वा विपरीतं(वँ) वा, पञ्चैते तस्य हेतवः॥ 15 ॥

मनुष्य मन,वाणी आणि शरीराने शास्त्राला अनुसरून किंवा त्याविरुद्ध जे कोणतेही कर्म करतो ,त्याचीही पाचही कारणे असतात .

तत्रैवं(म्) सति कर्तार- मात्मानं(ङ्) केवलं(न्) तु यः ।

पश्यत्यकृतबुद्धित्वान्-न स पश्यति दुर्मतिः ॥ 16 ॥

परंतु असे असूनही जो मनुष्य अशुद्ध बुद्धीमुळे करणे पूर्ण होण्यामध्ये केवळ आणि शुद्ध स्वरूपात आपल्याला कर्ता समजतो ,तो मलीन बुद्धीचा अज्ञानी खरे काळे ते जाणत नाही .

यस्य नाहङ्कृतो भावो, बुद्धिर्यस्य न लिप्यते ।

हत्वापि स इमाँल्लोकान्- न हन्ति न निबध्यते ॥ 17 ॥

ज्या माणसाच्या अंतःकरणात' मी कर्ता आहे' असा भाव नसतो,तसेच ज्याची बुद्धी संसारिक पदार्थात आणि कर्मात लिप्त होत नाही,तो माणूस या सर्व लोकांना मारूनही वास्तविक तो मारत नाही आणि त्याला पापही लागत नाही.

ज्ञानं(ञ्) ज्ञेयं(म्) परिज्ञाता, त्रिविधा कर्मचोदना ।

करणं(ङ्) कर्म कर्तेति, त्रिविधः(ख्) कर्मसङ्ग्रहः ॥ 18 ॥

ज्ञाता,ज्ञान आणि ज्ञेयया तीन प्रकारच्या कर्माच्या प्रेरणा आहेत.आणि कर्ता, करणतसेच क्रिया हे तीन प्रकारचे कर्म संग्रह आहेत .

ज्ञानं(ङ्) कर्म च कर्ता च, त्रिधैव गुणभेदतः ।

प्रोच्यते गुणसङ्ख्याने, यथावच्छृणु तान्यपि ॥ 19 ॥

गुणांची संख्या करणाऱ्या शास्त्रात ज्ञान,कर्म आणि कर्ताहे गुणांच्या भेदा ने तीन तीन प्रकारचेच सांगितले आहेत.तेही तू माझ्याकडून नीट ऐक .

सर्वभूतेषु येनैकं(म्), भावमव्ययमीक्षते ।

अविभक्तं(वँ) विभक्तेषु, तज्ज्ञानं(वँ) विद्धि सात्त्विकम् ॥ 20 ॥

ज्या ज्ञानामुळे माणूस" निरनिराळ्या सर्व भूतांमध्ये एक अविनाशी परमात्मा भाव विभाग रहित समभावाने भरून राहिला आहे",असे पाहतो,ते ज्ञान तू सात्विक आहे,असे जाण .

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं(न्), नानाभावान्पृथग्विधान् ।

वेत्ति सर्वेषु भूतेषु, तज्ज्ञानं(वँ) विद्धि राजसम् ॥ 21 ॥

परंतु ज्या ज्ञानाने मनुष्य सर्व भूतांमध्ये भिन्न भिन्न प्रकारांचे अनेक भाव वेगवेगळे जाणतो,ते ज्ञान तू राजस समज .

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्- कार्ये सक्तमहैतुकम्।

अतत्त्वार्थवदल्पं(ञ्) च, तत्तामसमुदाहृतम्॥ 22 ॥

परंतु जे ज्ञान एका कार्यरूपी शरीरातच पूर्ण सारखे आसक्त असते,तसेच जे युक्ती शून्य,तात्विक अर्थाने रहित आणि तुच्छ असते,ते तामस म्हटले गेले आहे .

नियतं(म्) सङ्गरहित- मरागद्वेषतः(ख्) कृतम।

अफलप्रेप्सुना कर्म, यत्तत्सात्त्विकमुच्यते॥ 23 ॥

जे कर्म शास्त्रविधीने नेमून दिलेले असून कर्तेपणाचा अभिमान न बाळगता फळाची इच्छा न करणाऱ्या माणसाने राग व द्वेष सोडून केलेले असते, सात्विक म्हटले जाते .

यत्तु कामेप्सुना कर्म, साहङ्कारेण वा पुनः।

क्रियते बहुलायासं(न्), तद्राजसमुदाहृतम्॥ 24 ॥

परंतु जे कर्म अतिशय परिश्रमपूर्वक तसेच भोगांची इच्छा करणाऱ्या किंवा अहंकार बाळगणाऱ्या माणसाकडून केले जाते ,ते राजस म्हटले गेले आहे .

अनुबन्धं(ङ्) क्षयं(म्) हिं(म्)सा-मनवेक्ष्य च पौरुषम् ।

मोहादारभ्यते कर्म, यत्तत्तामसमुच्यते॥ 25 ॥

जे कर्म परिणाम, हानी, हिंसा आणि सामर्थ्य यांचा विचार न करता केवळ अज्ञानाने केले जाते ,ते तामसा होते.

मुक्तसङ्गोऽनहं(वँ)वादी, धृत्युत्साहसमन्वितः ।

सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः(ख्), कर्ता सात्त्विक उच्यते॥ 26 ॥

जो कर्ता आसक्तीन बाळगणारा,' मी माझे' न म्हणणारा,धैर्य व उत्साहाने युक्त,'कार्यसिद्ध होवो न होवो',त्याविषयी हर्ष शौकाधीविकारांनी रहित असलेला -तो सात्विकम्हटला जातो .

रागी कर्मफलप्रेप्सुर्- लुब्धो हिं(म्)सात्मकोऽशुचिः।

हर्षशोकान्वितः(ख्) कर्ता, राजसः(फ्) परिकीर्तितः॥ 27 ॥

जो कर्ता आसक्तीअसलेला,कर्मांच्या फळांची इच्छा बाळगणारा,लोभी,इतरांना पीडा करण्याचा स्वभाव असलेला,अशुद्ध आचरणाचा आणि हर्ष -लोकांनी युक्त असतो,तो राज असं म्हटला जातो.

अयुक्तः(फ्) प्राकृतः(स्) स्तब्धः(श्), शठो नैष्कृतिकोऽलसः ।

विषादी दीर्घसूत्री च, कर्ता तामस उच्यते ॥ 28 ॥

जो कर्ता अयुक्त, अशिक्षित,घमेंडखोर,धूर्त,दुसऱ्यांची जीवन वृत्ती नाहीशी करणारा,शोक करणारा 'आळशी आणि दीर्घसूत्री असतो,तो तामस म्हटला जातो .

बुद्धेर्भेदं(न्) धृतेश्चैव, गुणतस्त्रिविधं(म्) श्रृणु ।

प्रोच्यमानमशेषेण, पृथक्त्वेन धनं(ञ्)जय ॥ 29 ॥

हे धनंजया !आता बुद्धीचे व धृतीचेही गुणांनुसार तीन प्रकारचे भेद माझ्याकडून पूर्णपणे विभाग पूर्वक सांगितले जात आहेत ,ते तू ऐक .

प्रवृत्तिं(ञ्) च निवृत्तिं(ञ्) च, कार्याकार्ये भयाभये।

बन्धं(म्) मोक्षं(ञ्) च या वेत्ति, बुद्धिः(स्) सा पार्थ सात्त्विकी ॥ 30 ॥

हे पार्था !जी बुद्धी प्रवृत्ती मार्ग व निवृत्ती मार्ग कर्तव्य आणि अकर्तव्य,भय आणि अभय,तसेच बंधन आणि मोक्ष यथार्थ पणे जाणते,सात्विक बुद्धी होय .

**यया धर्ममधर्मं(ञ्) च, कार्यं(ञ्) चाकार्यमेव च।**

**अयथावत्प्रजानाति, बुद्धिः(स्) सा पार्थ राजसी॥ 31 ॥**

हे पार्था !मनुष्य ज्या बुद्धीमुळे धर्म आणि अधर्म तसेच कर्तव्य आणि अकर्तव्य यथायोग्य रीतीने जाणत नाही,ती बुद्धी राजश्री होय .

**अधर्मं(न्) धर्ममिति या, मन्यते तमसावृता।**

**सर्वार्थान्विपरीतां(म्)श्च, बुद्धिः(स्) सा पार्थ तामसी॥ 32 ॥**

हे अर्जुना !तमोगुणाने व्यापलेली जी बुद्धी अधर्मालाही ' हा धर्म आहे' असे मानते,तसेच याच रीतीने इतर सर्व पदार्थांनाही विपरीत मानते,ती बुद्धी तामसी होय .

**धृत्या यया धारयते, मनः(फ्)प्राणेन्द्रियक्रियाः।**

**योगेनाव्यभिचारिण्या, धृतिः(स्) सा पार्थ सात्त्विकी ॥ 33 ॥**

हे पार्था !ज्या अव्यभिचारिणी धारणा शक्तीने मनुष्य ध्यान योगाने मन,प्राण व इंद्रिये यांच्या क्रिया धारण करीत असतो,ती धारणा सात्विक होय .

**यया तु धर्मकामार्थान्- धृत्या धारयतेऽर्जुन।**

**प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी, धृतिः(स्) सा पार्थ राजसी॥ 34 ॥**

परंतु हे कुंती पुत्र अर्जुना !फळाची इच्छा असलेला मनुष्य अति आसक्ती मुळे ज्या धारणा शक्तीने धर्म ,अर्थ व काम यांना धारण करतो,ती धारणा राज सी होय .

**यया स्वप्नं(म्) भयं(म्) शोकं(वँ), विषादं(म्) मदमेव च।**

**न विमुञ्चति दुर्मेधा, धृतिः(स्) सा पार्थ तामसी॥ 35 ॥**

हे पार्था !दुष्ट बुद्धीचा मनुष्य ज्या धारणा शक्तीमुळे झोप,भीती,काळजी,दुःख आणि उन्मत्तपणाही सोडत नाही अर्थात धारण करून राहतो,ती धारणा तामसी होय .

**सुखं(न्) त्विदानीं(न्) त्रिविधं(म्), श्रृणु मे भरतर्षभ।**

**अभ्यासाद्रमते यत्र, दुःखान्तं(ञ्) च निगच्छति ॥ 36 ॥**

हे भरत श्रेष्ठा !आता तीन प्रकारचे सुख ही तू माझ्याकडून ऐक. ज्या सुखात साधक भजन,ध्यान आणि सेवा इत्यादींच्या अभ्यासाने रमतो आणि ज्यामुळे त्याचे दुःख नाहीसे होते .

**यत्तदग्रे विषमिव, परिणामेऽमृतोपमम्।**

**तत्सुखं(म्) सात्त्विकं(म्) प्रोक्त- मात्मबुद्धिप्रसादजम्॥ 37 ॥**

जे आरंभी जरी विषयासारखे वाटले,तरी परिणामी अमृतासारखे असते,ते परमात्माविषयक बुद्धीच्या प्रसादाने उत्पन्न होणारे सुख सात्विक म्हटले गेले आहे .

विषयेन्द्रियसं(यँ)योगाद्-यत्तदग्रेऽमृतोपमम्।

परिणामे विषमिव, तत्सुखं(म्) राजसं(म्) स्मृतम्॥ 38 ॥

जे सुख विषय आणि इंद्रियांच्या संयोगाने उत्पन्न होते,ते प्रथम भोगताना अमृता सारखे वाटत असले तरी परिणामी विषयासारखे असते. म्हणून ते सुख राज असं म्हटले गेले आहे .

यदग्रे चानुबन्धे च, सुखं(म्) मोहनमात्मनः।

निद्रालस्यप्रमादोत्थं(न्), तत्तामसमुदाहृतम्॥ 39 ॥

जे सुखभोगकाली आणि परिणामी ही आपल्याला मोह पाडणारे असते,ते झोप,आळस आणि प्रमादापासून उत्पन्न झालेले सुख तामस म्हटले आहे .

न तदस्ति पृथिव्यां(वँ) वा, दिवि देवेषु वा पुनः।

सत्त्वं(म्) प्रकृतिजैर्मुक्तं(यँ), यदेभिः(स्) स्यात्त्रिभिर्गुणैः॥ 40 ॥

पृथ्वीवर,आकाशात किंवा देवांत तसेच यांच्याशिवाय इतरत्र कोठेही असा कोणताच प्राणी किंवा पदार्थ नाही की जो प्रकृती पासून उत्पन्न झालेल्या या तीन गुणांनी रहित असेल .

ब्राह्मणक्षत्रियविशां(म्), शूद्राणां(ञ्) च परन्तप।

कर्माणि प्रविभक्तानि, स्वभावप्रभवैर्गुणैः॥ 41 ॥

हे परंतपा !ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि शूद्र यांची कर्मे स्वभावत हा उत्पन्न झालेल्या गुणांमुळे निरनिराळी केली गेली आहेत .

शमो दमस्तपः(श्) शौचं(ङ्), क्षान्तिरार्जवमेव च।

ज्ञानं(वँ) विज्ञानमास्तिक्यं(म्), ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ 42 ॥

अंतःकरणाचा निग्रह ,इंद्रियांवर ताबा ठेवणे,धर्मासाठी कष्ट सहन करणे ,दुसऱ्यांच्या अपराधांना क्षमा करणे,अंतर्बाह्य शुद्ध राहणे,मन इंद्रिये व शरीर सरळ राखणे,वेद शास्त्र ईश्वर व परलोक इत्यादींवर विश्वास ठेवणे 'वेदशास्त्रांचे अध्ययन अध्यापन करणे आणि परमात्मा तत्वाचा अनुभव घेणे ही सर्वच्या सर्व ब्राह्मणाची स्वाभाविक कर्म आहेत .

शौर्यं(न्) तेजो धृतिर्दाक्ष्यं(यँ), युद्धे चाप्यपलायनम्।

दानमीश्वरभावश्च, क्षात्रं(ङ्) कर्म स्वभावजम्॥ 43 ॥

शौर्य तेज धैर्य चातुर्य युद्धातून पलायन न करणे,दान देणे आणि स्वामी भाऊ ही सर्वच्या सर्व क्षत्रियांची स्वाभाविक कर्मे आहेत .

कृषिगौरक्ष्यवाणिज्यं(वँ), वैश्यकर्म स्वभावजम्।

परिचर्यात्मकं(ङ्) कर्म, शूद्रस्यापि स्वभावजम्॥ 44 ॥

शेती,गोपालन आणि क्रियविक्रय रूप सत्य व्यवहार ही वैशियाची स्वाभाविक कर्मे होत.तसेच सर्व वर्णांची सेवा करणे हे शूद्राचेही स्वाभाविक कर्म आहे .

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः(स्), संसिद्धिं(लँ) लभते नरः।**

**स्वकर्मनिरतः(स्) सिद्धिं(यँ), यथा विन्दति तच्छृणु॥ 45 ॥**

आपापल्या स्वाभाविक करमांत तत्पर असलेल्या मनुष्यास भगवतप्राप्ती रूप परम सिद्धीचा लाभ होतो.आपल्या स्वाभाविकर्मांत रथ असलेला मनुष्य जा रितीने कर्म करून परमसिद्धीला प्राप्त होतो,ती रीत तू ऐक .

**यतः(फ्) प्रवृत्तिर्भूतानां(यँ), येन सर्वमिदं(न्) ततम्।**

**स्वकर्मणा तमभ्यर्च्य, सिद्धिं(वँ) विन्दति मानवः॥ 46 ॥**

ज्या परमेश्वरापासून सर्व प्राण्यांची उत्पत्ती झाली आहे आणि जाने हे सर्व जग व्यापले आहे ,त्या परमेश्वराची आपल्या स्वाभाविक कर्मांनी पूजा करून मनुष्य परमसिद्धी मिळावी तो .

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः(फ्), परधर्मात्स्वनुष्ठितात्।**

**स्वभावनियतं(ङ्) कर्म, कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्॥ 47 ॥**

उत्तम प्रकारे आचारीलेल्या दुसऱ्याच्या धर्मापेक्षा वैगून्य असलेला ही आपला धर्म श्रेष्ठ आहे .कारण स्वभावाने नेमून दिलेले सदर मरूप कर्म करणाऱ्या माणसाला पाप लागत नाही .

**सहजं(ङ्) कर्म कौन्तेय, सदोषमपि न त्यजेत्।**

**सर्वारम्भा हि दोषेण, धूमेनाग्निरिवावृताः॥ 48 ॥**

म्हणूनच हे कुंती पुत्रा !सदोष असले तरीही स्वाभाविक कर्म सोडून देऊ नये.कारण धुराने जसा अग्नी ,तशी सर्व कामे कोणत्या ना कोणत्या दोषाने युक्त असतात .

**असक्तबुद्धिः(स्) सर्वत्र, जितात्मा विगतस्पृहः।**

**नैष्कर्म्यसिद्धिं(म्) परमां(म्), सन्न्यासेनाधिगच्छति॥ 49 ॥**

सर्वत्र आसक्तिरहितबुद्धी असलेला,निस्पृह आणि अंतःकरण जिंकलेला मनुष्य सांख्ययोगाने त्या श्रेष्ठ निष्कर्म्य सिद्धीला प्राप्त होतो .

**सिद्धिं(म्) प्राप्तो यथा ब्रह्म, तथाप्नोति निबोध मे।**

**समासेनैव कौन्तेय, निष्ठा ज्ञानस्य या परा॥ 50 ॥**

हे कुंती पुत्रा !जी ज्ञान आयोगाची अंतिम स्थिती आहे,त्या नैष्कर्म्य सिद्धिला ज्या रितीने प्राप्त होऊन मनुष्य ब्रह्माला प्राप्त होतो, ती रीत थोडक्यात तू माझ्याकडून समजून घे .

**बुद्ध्या विशुद्धया युक्तो, धृत्यात्मानं(न्) नियम्य च।**

**शब्दादीन्विषयां(म्) स्त्यक्त्वा, रागद्वेषौ व्युदस्य च॥ 51 ॥**

विविक्तसेवी लघ्वाशी, यतवाक्कायमानस।

ध्यानयोगपरो नित्यं(वँ), वैराग्यं(म्) समुपाश्रितः॥ 52 ॥

अहङ्कारं(म्) बलं(न्) दर्पं(ङ्), कामं(ङ्) क्रोधं(म्) परिग्रहम्।

विमुच्य निर्ममः(श्) शान्तो, ब्रह्मभूयाय कल्पते॥ 53 ॥

विशुद्ध बुद्धीने युक्त ;हलके, सात्विकआणि नियमित भोजन घेणारा ;शब्दा दी विषयांचा त्याग करून एकांतात शुद्ध ठिकाणी राहणारा; सात्विकधारणा शक्तीने अंतकरण व इंद्रियांवर संयम ठेवून मन ,वाणी आणि शरीर ताब्यात ठेवणारा; राग द्वेष पूर्णपणे नाहीसे करून चांगल्या प्रकारे दृढ वैराग्याचा आश्रय घेणारा; अहंकार,बळ,घमेंड,कामना,राग,संग्रह वृत्ती यांचा त्याग करून नेहमी ध्यान योगात तत्पर असणारा; ममता रहित व शांती युक्त असा पुरुष सच्चिदानंद घन ब्रह्मामध्ये एकरूप होऊन राहण्यास पात्र होतो .

ब्रह्मभूतः(फ्) प्रसन्नात्मा, न शोचति न काङ्क्षति।

समः(स्) सर्वेषु भूतेषु, मद्भक्तिं(लँ) लभते पराम्॥ 54 ॥

मग तो सच्चिदानंद घन ब्रह्मांत तद्रूप झालेला प्रसन्न चित्ताचा योगी कशाबद्दलही शोक करीत नाही आणि कशाचीही इच्छा करीत नाही. असा सर्व प्राण्यांच्या ठिकाणी समभाव बाळगणारा योगी माझ्या पराभक्तीला प्राप्त होतो .

भक्त्या मामभिजानाति, यावान्यश्चास्मि तत्त्वतः।

ततो मां(न्) तत्त्वतो ज्ञात्वा, विशते तदनन्तरम्॥ 55 ॥

त्या पराभक्तीच्या योगाने तो मज परमात्म्याला'मी जो आणि जसा आहे ' अगदी बरोबर तसाच तत्वतः जाणतो. तसेच त्या भक्तीने मला तत्वतः जाणून त्याच वेळी माझ्यात प्रविष्ट होतो .

सर्वकर्माण्यपि सदा, कुर्वाणो मद्व्यपाश्रयः।

मत्प्रसादादवाप्नोति, शाश्वतं(म्) पदमव्ययम्॥ 56 ॥

माझ्या आश्रेयाने राहणारा कर्मयोगी सर्व कामे नेहमी करीत असला तरी माझ्या कृपेने सनातन अविनाशी परमपदाला प्राप्त होतो .

चेतसा सर्वकर्माणि, मयि सन्न्यस्य मत्परः।

बुद्धियोगमुपाश्रित्य, मच्चित्तः(स्) सततं(म्) भव॥ 57 ॥

सर्व करणे मनाने माझ्या ठिकाणी अर्पण करून तसेच सम बुद्धी रूप योगाचा अवलंब करून मतपरायण आणि निरंतर माझ्या ठिकाणी चित्त असलेला हो .

मच्चित्तः(स्) सर्वदुर्गाणि, मत्प्रसादात्तरिष्यसि।

अथ चेत्वमहङ्कारान्, नश्रोष्यसि विनङ्क्ष्यसि॥ 58 ॥

वर सांगितल्याप्रमाणे माझ्या ठिकाणी चित्त ठेवल्याने तू माझ्या कृपेने सर्व संकटातून सहजच पार होशील आणि जर अहंकारामुळे माझे सांगणे ऐकशील तर नष्ट होशील अर्थात परमार्थाला मुकशील .

**यदहङ्कारमाश्रित्य, न योत्स्य इति मन्यसे ।**

**मिथ्यैष व्यवसायस्ते, प्रकृतिस्त्वां(न्) नियोक्ष्यति ॥ 59 ॥**

तू अहंकार धरून' मी युद्ध करणार नाही'असे मानतोस,तो तुझा निश्चय व्यर्थ आहे.कारण तुझा स्वभाव तुला जबरदस्तीने युद्ध करावयास लावील .

**स्वभावजेन कौन्तेय, निबद्धः(स्) स्वेन कर्मणा ।**

**कर्तुं(न्) नेच्छसि यन्मोहात्- करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ 60 ॥**

हे कुंती पुत्रा ! जे कर्म तू मोहामुळे करू इच्छित नाहीस,तेही आपल्या पूर्वकृत स्वाभाविक कर्माने बद्ध असल्यामुळे पराधीन होऊन करशील .

**ईश्वरः(स्) सर्वभूतानां(म्), हृद्देशेऽजुर्न तिष्ठति।**

**भ्रामयन्सर्वभूतानि, यन्त्रारूढानि मायया॥ 61 ॥**

हे अर्जुना ! अंतरी आम्ही परमेश्वर आपल्या मायेने शरीरुपयंत्रावर अरुण झालेल्या सर्व प्राण्यांना त्यांच्या कर्मानुसार फिरवीत सर्व प्राण्यांच्या हृदयांत राहिला आहे .

**तमेव शरणं(ङ्) गच्छ, सर्वभावेन भारत।**

**तत्प्रसादात्परां(म्) शान्तिं(म्), स्थानं(म्) प्राप्स्यसि शाश्वतम्॥ 62 ॥**

हे भारता ! तू सर्व प्रकारे त्या परमेश्वरालाच शरण जा. त्या परमात्म्याच्या कृपेनेच तुला परमशांती आणि सनातन परम धाम मिळेल .

**इति ते ज्ञानमाख्यातं(ङ्), गुह्याद्गुह्यतरं(म्) मया ।**

**विमृश्यैतदशेषेण, यथेच्छसि तथा कुरु ॥ 63 ॥**

अशाप्रकारे हे गोपनीयाहूनही अति गोपनीय ज्ञान मी तुला सांगितले.आता तू या रहस्यमय ज्ञानाचा संपूर्णपणे चांगला विचार करून मग जसे तुला आवडेल तसेच कर .

**सर्वगुह्यतमं(म्) भूयः(श्), श्रृणु मे परमं(वँ) वचः ।**

**इष्टोऽसि मे दृढमिति, ततो वक्ष्यामि ते हितम् ॥ 64 ॥**

सर्व गोपनीयाहून अति गोपनीय माझे परमरहस्ययुक्त वचन तू पुन्हा ऐक. तू माझा अत्यंत आवडत आहेस,म्हणून हे परम हितकारक वचन मी तुला सांगणार आहे .

**मन्मना भव मद्भक्तो, मद्याजी मां(न्) नमस्कुरु ।**

**मामेवैष्यसि सत्यं(न्) ते, प्रतिजाने प्रियोऽसि मे॥ 65 ॥**

हे अर्जुना ! तू माझ्या ठिकाणी मन ठेव. माझा भक्त हो. माझे पूजन कर आणि मला नमस्कार कर . असे केले असता तू मलाच येऊन मिळतील. हे मी तुला सत्य प्रतिज्ञा पूर्वक सांगतो. कारण तू माझा अत्यंत आवडता आहेस.

**सर्वधर्मान्परित्यज्य, मामेकं(म्) शरणं(व्ँ) व्रज ।**

**अहं(न्) त्वा सर्वपापेभ्यो, मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ 66 ॥**

सर्वधर्म म्हणजे सर्व कर्तव्य करणे मला अर्पण करून तू केवळ सर्व शक्तीमान, सर्वाधार अशा मला परमेश्वरालाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून सोडवीन. तू शोक करू नकोस.

**इदं(न्) ते नातपस्काय, नाभक्ताय कदाचन ।**

**न चाशुश्रूषवे वाच्यं(न्), न च मां(य्ँ) योऽभ्यसूयति ॥ 67 ॥**

हा गीता रूप रहस्यमय उपदेश कधीही तपन करणाऱ्या माणसाला सांगू नये.तसेच भक्तीही न माणसाला आणि ऐकण्याची इच्छा नसणाऱ्यालाही सांगू नये. त्याचप्रमाणे माझ्यामध्ये दोष पाहणाऱ्याला तर कधीही सांगू नये.

**य इमं(म्) परमं(ङ्) गुह्यं(म्), मद्भक्तेष्वभिधास्यति ।**

**भक्तिं(म्) मयि परां(ङ्) कृत्वा, मामेवैष्यत्यसं(म्)शयः॥ 68 ॥**

जो पुरुष माझ्या ठिकाणी परम प्रेम ठेवून हे परमरहस्यक्त गीता शास्त्र माझ्या भक्तांना सांगेल ,तो मलाच प्राप्त होईल,यात मुळीच शंका नाही .

**न च तस्मान्मनुष्येषु, कश्चिन्मे प्रियकृत्तमः ।**

**भविता न च मे तस्मा- दन्यः(फ्) प्रियतरो भुवि ॥ 69 ॥**

माझे अत्यंत प्रिय कार्य करणारा त्याच्याहून अधिक मनुष्यांत कोणीही नाही. तसेच पृथ्वीवर त्याच्याहून अधिक मला प्रिय दुसरा कोणी भविष्यकाली होणारही नाही .

**अध्येष्यते च य इमं(न्), धर्म्यं(म्) सं(व्ँ)वादमावयोः ।**

**ज्ञानयज्ञेन तेनाह-मिष्टः(स्) स्यामिति मे मतिः ॥ 70 ॥**

जो पुरुष आम्हा दोघांच्या धर्ममय संवाद रुपया गीता शास्त्राचे अध्ययन करी ल ,त्याच्याकडूनही मी ज्ञानयज्ञाने पूजित होईल ,असे माझे मत आहे .

**श्रद्धावाननसूयश्च, श्रृणुयादपि यो नरः ।**

**सोऽपि मुक्तः(श्) शुभाँल्लोकान्- प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥ 71 ॥**

जो मनुष्य श्रद्धायुक्त होऊन दोषदृष्टी न ठेवता या गीता शास्त्राचे श्रवण करील ,तोही पापड पासून मुक्त होऊन पुण्य कर्मे करणाऱ्यांच्या श्रेष्ठ लोकांना प्राप्त होईल .

**कच्चिदेतच्छ्रुतं(म्) पार्थ, त्वयैकाग्रेण चेतसा ।**

**कच्चिदज्ञानसम्मोहः(फ्), प्रनष्टस्ते धनञ्जय ॥ 72 ॥**

हे पार्था ! हे गीता शास्त्र तु एकाग्रचिताने ऐकलेस का ? आणि हे धनंजया! तुझा अज्ञानातून उत्पन्न झालेला मोह नाहीसा झाला का ?

## अर्जुन उवाच

नष्टो मोहः(स्) स्मृतिर्लब्धा, त्वप्रसादान्मयाच्युत ।

स्थितोऽस्मि गतसं(न्)देहः(ख्), करिष्ये वचनं(न्) तव ॥ 73 ॥

अर्जुन म्हणाला' हे अच्युता ! आपल्या कृपेने माझा मोह नाहीसा झाला आणि मला स्मृती प्राप्त झाली.आता मी संशय रहित होऊन राहिलो आहे. म्हणून मी आपल्या आज्ञाचे पालन करीन .

## सं(ञ्)जय उवाच

इत्यहं(वँ) वासुदेवस्य, पार्थस्य च महात्मनः ।

सं(वँ)वादमिममश्रौष-मद्भुतं(म्) रोमहर्षणम् ॥ 74 ॥

संजय म्हणाला,अशाप्रकारे मी श्री वासुदेव आणि महात्मा अर्जुन यांचा हा अद्‌भुत रहस्यमय रोमांचकारक संवाद ऐकला .

व्यासप्रसादाच्छ्रुतवा-नेतद्गुह्यमहं(म्) परम् ।

योगं(यँ) योगेश्वरात्कृष्णात्- साक्षात्कथयतः(स्) स्वयम्॥ 75 ॥

ही व्यासांच्या कृपेने दिव्यदृष्टी मिळवून मी हा पर्व गोपनीय योग अर्जुनाला सांगत असताना स्वतः योगेश्वर भगवान श्रीकृष्णांकडून प्रत्यक्ष ऐकला आहे .

राजन्सं(म्)स्मृत्य सं(म्)स्मृत्य, सं(वँ)वादमिममद्भुतम्।

केशवार्जुनयोः(फ्) पुण्यं(म्), हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥ 76 ॥

महाराज ! भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुनाचा हा रहस्यमय ,कल्याणकारक आणि अद्‌भुत संवाद पुन्हा पुन्हा आठवण मी वारंवार आनंदीत होत आहे .

तच्च सं(म्)स्मृत्य सं(म्)स्मृत्य, रूपमत्यद्भुतं(म्) हरेः ।

विस्मयो मे महान् राजन्-हृष्यामि च पुनः(फ्) पुनः ॥ 77 ॥

हे राजन ! श्रीहरीचे ते अत्यंत अलौकिक रूपही वरचेवर आठवून माझ्या मनाला खूप आश्चर्य वाटत आहे आणि मी वारंवार आनंदित होत आहे आणि हर्ष पूलकित होत आहे .

यत्र योगेश्वरः(ख्) कृष्णो, यत्र पार्थो धनुर्धरः ।

तत्र श्रीर्विजयो भूतिर्- ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ 78 ॥

जेथे योगेश्वर भगवान श्रीकृष्ण आहेत आणि जेथे गांडीव धनुष्य धारण करणारा अर्जुन आहे ,तेथेच श्री, विजय ,विभूती आणि अचल नीती आहे, असे माझे मत आहे .

इति श्रीमहाभारते भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतापर्वणि
श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां(यँ) योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसं(वँ)वादे मोक्षसंन्यासयोगो नामाष्टादशोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शांतिः(श्) शांतिः(श्) शांतिः ॥

"तो (परब्रह्म) पूर्ण आहे, हे (सृष्टी) देखील पूर्ण आहे; पूर्णामधून पूर्ण निर्माण होते, आणि पूर्ण घेऊन (निर्मितीनंतरही) पूर्णच उरते."